सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
डॉ. संतोष परचुरे
संचालक

संदर्भ क्र.:विविमं/२०२०—२१/८१ दिनांक : २२/०९/२०२०.

प्रति,
मा. प्राचार्य / मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय : 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी मोहिम' दि. १५ सप्टेंबर ते २५ ऑक्टोबर २०२० या कालावधीत राबविणेबाबत.

संदर्भ क्र. : १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे संकीर्ण—२०२०/प्र.क्र. ९२/साशि—७ दिनांक १७.०९.२०२० चे पत्र.

२. सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कोरोना २०२०/प्र.क्र.३९१/आरोग्य ५, दिनांक ११.०९.२०२० चे पत्र.

महोदय/महोदया,

मा. मुख्यमंत्री महोदय (महाराष्ट्र शासन) यांचे सल्लागार डॉ. दिपक म्हैसेकर यांनी सूचित केल्यानुसार मा. राज्य संपर्क अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांच्या पत्रानुसार प्रत्येक विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभाग, सांस्कृतिक विभाग व विद्यार्थ्यांशी संबंधित इतर विभागांनी "माझे कुटुंब, माझी जबाबदारी मोहिम" यामध्ये सहभागी होण्यासाठी निर्देशित केले आहे. ही मोहिम दि. १५ सप्टेंबर ते २५ ऑक्टोबर २०२० दरम्यान राबविण्यात येणार आहे. कोवीड—१९ साथ नियंत्रणासाठी 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' ही मोहीम अत्यंत महत्वाची आहे.

आपल्या महाविद्यालयातील/परिसंस्थेतील विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय छात्र सेना विभाग व विद्यार्थ्यांशी संबंधित इतर विभागांतील स्वयंसेवक व विद्यार्थी यांच्या समन्वय व सहकार्यातून "माझे कुटुंब, माझी जबाबदारी मोहिम" राबविण्याबाबत संबंधितांना सूचित करावे.

याबाबतचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. शासनाच्या निर्देशानुसार दि. १५ सप्टेंबर ते २५ ऑक्टोबर २०२० या कालावधीत होणाऱ्या "माझे कुटुंब, माझी जबाबदारी मोहिमे" बाबत आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेतील सर्व संबंधितांच्या निदर्शनास सदर पत्राचा आशय आणून विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थ्यांशी संबंधित इतर विभाग यांच्या समन्वय व सहकार्यातून "माझे कुटुंब, माझी जबाबदारी मोहिम" राबविण्याबाबत आणि संकलित माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरण्याबाबत संबंधितांना सूचित करावे. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

संचालक
विद्यार्थी विकास मंडळ

माझे कुटुंब, माझी जबाबदारी

https://nss.unipune.ac.in/

↓

**For Volunteers**

▼

**Regular Student Login (Exam Form/Student Profile)**

▼

**Student Login**

▼

**Login By**

▼

**(Email Id/Mobile No./Aadhar No./Passport No. for only International students)**

▼

**After Login**

▼

**NSS Warriors**

▼

**NSS Covid-19**

▼

**Personal Information**

▼

**Update**

▼

**Volunteer Additional Information**

▼

**Volunteer Family Information**

▼

**After Fill & Save Data**

▼

**Add New Family Data Multiple Entries**

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,

एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई- ४०० ००१.

Email- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२- २२६७९५६५


---

क्र.- संकीर्ण-२०२०/प्र.क्र.९२/साशि-७ दिनांक- १७.०९.२०२०

प्रति,

मा. कुलगुरू / मा. संचालक

सर्व विद्यापीठे / संचालनालये

**विषय- " माझे कुटुंब, माझी जबाबदारी मोहिम "**
**दि. १५.०९.२०२० ते २५.१०.२०२० या कालावधीत राबविणेबाबत.**

**संदर्भ- सार्वजनिक आरोग्य विभागाचे पत्र क्र. कोरोना-२०२०/प्र.क्र.३९१/ आरोग्य-५, दिनांक ११.०९.२०२०**

मा. महोदय,

मा. मुख्यमंत्री महोदय (महाराष्ट्र शासन) यांचे सल्लागार डॉ. दिपक म्हैसेकर यांनी सूचित केल्यानुसार, प्रत्येक विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी विकास विभाग, सांस्कृतीक विभाग, शारीरिक शिक्षण विभाग, आजीवन व निरंतन शिक्षण विभाग व विद्यार्थ्यांशी संबंधित इतर सर्व विभाग, या विभागांतील सर्व विद्यार्थ्यांना " माझे कुटुंब, माझी जबाबदारी" या मोहिमेमध्ये सहभागी होण्यासाठी निर्देशित केले आहे. सबब ही मोहिम राबविण्यासाठी कृपया आपण मा. कुलसचिव यांना निर्देशीत करून, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांना या मोहिमेमध्ये सहभागी होण्याचे निर्देश निर्गमीत करावेत.

"माझे कुटुंब, माझी जबाबदारी" या मोहिमेच्या अंमलबजावणीबाबतची मार्गदर्शक पुस्तिका सोबत जोडण्यात आली आहे.

या मोहिमेमध्ये पुढील त्रिसूत्रीचा अवलंब करावा- १) मास्क वापरणे २) हात स्वच्छ धुणे ३) शारीरिक अंतर राखणे. या त्रिसूत्रीद्वारे जनजागृती करण्याकरिता, शासनाने निर्देशित केलेल्या सदर मोहिमेबाबतच्या उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार स्वयंसेवक व विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून घरोघरी सर्वेक्षणामध्ये सहभागी व्हावे, अशा प्रकारचे निर्देश देण्यात यावेत.

मी आपणांस विनंती करीतो की, आपल्या अधिनस्त महाविद्यालयांच्या उपरोक्त विद्यार्थी संबंधित सर्व विभागांकडून, महाविद्यालयीन प्रत्येक विद्यार्थ्याची व त्या विद्यार्थ्याच्या कुटुंबाची एकत्रित माहिती विद्यापीठांच्या वेबसाईट पोर्टल वर अपलोड केली जाईल, असे पहावे.

तसेच जेव्हा मा. मुख्यमंत्री कार्यालयाकडून अंमलबजावणीबाबतची विचारणा केली जाईल, तेव्हा सदर विद्यापीठांनी अपलोड केलेली संकलित माहिती ( प्रत्येक विद्यापीठ इतक्या कुटुंबांपर्यंत पोचले आहे ) मा. मुख्यमंत्री कार्यालयाकडे सादर करण्यात येईल, असे पहावे.

कृपया आपल्या स्तरावर या विभागांच्या मदतीने मोहिमेचे सर्वेक्षण करण्यात यावे. या सर्वेक्षणातून आपल्या अधिनस्त महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थी व त्या विद्यार्थ्याचे कुटुंब सुरक्षित आहे, याचे सर्वेक्षण करण्यात यावे. जर सुरक्षित नसतील, तर त्याबाबतीत आजारी व्यक्ती व त्यांचे विलगीकरण कसे केले आहे, याची माहिती संकलित करण्यात यावी. कुटुंबाला सजग करण्यासाठी ईमेल, व्हॉटसअॅप, सोशल मेडियाद्वारे जनजागृती मोहिम राबविण्यात यावी.

आपला,

डॉ. अतुल हं. साळुंके
(राज्य संपर्क अधिकारी/ विशेष कार्य अधिकारी)
महाराष्ट्र शासन

सोबत- १. संदर्भीय पत्राची प्रत
२."माझे कुटुंब, माझी जबाबदारी" या मोहिमेच्या अंमलबजावणीबाबतची मार्गदर्शक पुस्तिका.

**प्रत पुढील कार्यवाहीसाठी-**

१. कुलसचिव
२. कार्यक्रम समन्वयक तथा संचालक, राष्ट्रीय सेवा योजना
३. संचालक, विद्यार्थी विकास,
४. संचालक, शारीरिक शिक्षण विभाग,
५. संचालक, आजीवन आणि निरंतन शिक्षण विभाग

# महाराष्ट्र शासन

अत्यंत तातडीचे

क्रमांक: कोरोना २०२०/प्र.क्र. ३९१/आरोग्य ५
सार्वजनिक आरोग्य विभाग,
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
कॉप्लेक्स बिल्डिंग, नविन मंत्रालय,
मुंबई-४०० ००१
दिनांक- ११ सप्टेंबर, २०२०

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व),
जिल्हाधिकारी (सर्व).
मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व)
महानगर पालिका आयुक्त (सर्व)

विषय - कोवीड-१९ नियंत्रणासाठी तसेच मृत्यु दर कमी करण्यासाठी "माझे कुटुंब - माझी जबाबदारी" कोवीड मुक्त महाराष्ट्र ही मोहीम राबविणे बाबत.

मागील २ आठवडयांमध्ये राज्यातील कोवीड-१९ रुग्णांमध्ये मृत्यूमध्ये लक्षणीयरित्या भर पडत आहे. यापुढे कोवीड-१९ नियंत्रण कार्यवाही जनतेच्या सहभागातून आवश्यक आहे. यासाठी राज्यभर "माझे कुटुंब - माझी जबाबदारी" ही मोहिम राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

"माझे कुटुंब -माझी जबाबदारी" मोहिमेअंतर्गत राज्यातील शहर/ गाव /पाडे-वस्त्या/ तांडे यातील प्रत्येक नागरीकाची आरोग्य तपासणी, कोमॉर्बीड आजार असल्यास उपचार आणि प्रत्येक नागरीकास व्यक्तीश: भेटून आरोग्य शिक्षण दयावयाचे आहे. वरील मोहीम दि.१५/०९/२०२० ते २५/१०/२०२० या कालांवधीमध्ये घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

दि.१५/०९/२०२० पासून मोहीम राबवयाची असल्यामुळे लगेचच पूर्व तयारी सुरु करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रारुप मार्गदर्शक सुचना सोबत जोडल्या आहेत. त्यातील त्वरीत अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक बाबी आपणांस पुढील प्रमाणे कळविण्यात येत आहे:-

१. मोहीम कालावधीमध्ये गृहभेटी देण्यासाठी आरोग्य पथके तयार करावीत. प्रत्येक जिल्हयास आवश्यक आरोग्य पथकांची संख्या सोबत जोडली आहे. एका पथकामध्ये १ आरोग्य कर्मचारी आणि २ स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिलेले स्वयंसेवक असतील.
२. एक पथक दररोज ५० घरांना भेटी देईल. भेटीदरम्यान घरातील सर्व सदस्यांचे तापमान SpO२ तपासणे तसेच Comorbid Condition आहे का याची माहिती घेण्यात येईल.



Scanned by CamScanner

३. ताप, खोकला, दम लागणे, SpO२ कमी अशी कोविडसदृष्य लक्षणे असणाऱ्या व्यक्तींना जवळच्या Fever Clinic मध्ये संदर्भित करण्यात येईल. Fever Clinic मध्ये कोवीड-१९ प्रयोगशाळा चाचणी करुन पुढील उपचार केले जातील.

४. कोमॉर्बीड Condition असणारे रुग्ण नियमित उपचार घेतात का याची खात्री केली जाईल आणि आवश्यक तेथे औषधे व तपासणीत संदर्भित केले जाईल.

५. प्रत्येक ५ ते१० पथकांमागे १ डॉक्टर उपचार व संदर्भसेवा देईल.

६. घरातील सर्व सदस्यांना व्यक्तीशः प्री कोवीड, कोवीड आणि पोस्ट कोवीड परिस्थितीनुसार आरोग्य संदेश समजावुन सांगितले जातील.

उपरोक्त अनुसार कार्यवाही करण्यासाठी पुढील प्रमाणे नियोजन करण्यात यावेत:-

१) मार्गदर्शक सूचनामध्ये नमुद केल्यानुसार लोकसंख्येनुसार प्रा.आ.केंद्र, शहर/गाव येथे आरोग्य पथके तयार करुन त्यांना प्रशिक्षण देणे आणि साहित्य वाटप करावे.

२) प्रत्येक ५-१० पथकामागे १ डॉक्टर निश्चित करावा व तसे आदेश निर्गमित करावे.

३) कोमॉर्बीड रुग्णांच्या उपचारासाठी, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदय विकार, किडनी विकार इ. आजारासाठी प्रोटोकॉलनुसार लागणारी औषधींचा साठा प्रा.आ.केंद्र/ रुग्णालय स्तरावर उपलब्ध करावा. साठा कमी असल्यास NHMच्या Free Medicine निधीतून खरेदी करावी.

४) ताप उपचार केंद्र (Fever Treatment Center) प्रत्येक CCC/CHC/DCH मध्ये कार्यान्वित करावे. याठिकाणी संदर्भित होणा-या रुग्णांना संशयीत रुग्ण कक्षात दाखल करुन कोवीड-१९ चाचण्या कराव्यात. प्रत्येक तालुक्यात किमान १ ताप उपचार केंद्र कार्यरत असणे आवश्यक आहे.

५) आवश्यकतेनुसार व नवीन CCC/CHC/DCH स्थापन करण्यासाठी नियोजन करावे.

६) ऑक्सीजन पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी नियोजन करावे.

७) संशयीत कोवीड-१९ रुग्णांना कडून FTC मध्ये आणण्यासाठी प्रत्येक २-३ प्रा.आ.केंद्रा मागे किमान १ Ambulance ची सोय करावी.

८) लोकप्रतिनिधी व खाजगी रुग्णालय, स्वयंसेवीका यांचा या मोहीमेसाठी सहभाग घ्यावा.

"माझे कुटुंब-माझी जबाबदारी" मोहीम ही कोवीड-१९ साथ नियंत्रणासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे आपल्या जिल्हयात मोहीमेची अंमलबजावणी कोटकोरपणे होईल आणि सर्व संशयीत कोवीड-१९ रुग्ण आणि कोमॉर्बीड व्यक्ती यांना तपासणी, चाचणी व उपचार या सेवा मिळतील याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

Pradeep Vyas

(डॉ. प्रदीप व्यास)

प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य

सहपत्र- मार्गदर्शक सूचना



Scanned by CamScanner

प्रत माहीतीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव:-

१) अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२) अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव, नगर विकास-२, मंत्रालय, मुंबई
४) सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
५) सचिव, महिला व बाल कल्याण विकास, मंत्रालय, मुंबई
६) आयुक्त तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
७) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई/ पुणे
८) उपसंचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, (सर्व मंडळे)
९) जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
१०) जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)



Scanned by CamScanner

## "माझे कुटुंब माझी जबाबदारी" मोहीम अंमलबजावणी मार्गदर्शक पुस्तीका :-

राज्यात सध्या कोवीड बाधित रुग्णांच्या निकट संपर्कातील व्यक्तींचा शोध घेण्यासाठी ट्रेस, ट्रॅक, ट्रीट या त्रिसुत्रीचा वापर करून कोवीड प्रादुर्भाव आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. असे असूनही, महाराष्ट्र राज्यामध्ये कोवीड-१९ या आजाराचे रुग्णांची संख्या दिसेंदिवस वाढत आहे. मुंबई, पुणे, ठाणे इ. शहरामधील या आजाराची रुग्णांच्या तुलनेने स्थिर होत असली तरी इतर जिल्हे आणि ग्रामीण भागामध्ये कोवीड-१९ रुग्ण मोठया प्रमाणात आढळून येत आहेत. राज्याच्या अनलॉक मार्गदर्शक सुचनांनुसार हळूहळू जनजीवन पुर्वपदावर येत असून सामान्य जनतेमध्ये या आजाराची भीती कमी होत आहे. अनलॉक सुरु असताना कोरोना नियंत्रण अधिक प्रभावीपणे करण्यासाठी राज्यातील सर्व लोकसंख्येला २ वेळा भेटी देऊन आरोग्य शिक्षण, महत्त्वाचे आरोग्य संदेश संशयीत कोवीड रुग्ण शोधणे तसेच मधुमेह, हृदयविकार, किडनी आजार, लठ्पणा यासारख्या महत्त्वाच्या Co-morbid condition असणाऱ्या व्यक्ती शोधून काढणे, अशा activities करण्यात येतील. मोहिम कालावधीमध्ये प्रत्येक व्यक्तीस आरोग्य शिक्षण व कोवीड प्रतिबंधाचे संदेश देण्यात येतील.संपूर्ण मोहीम स्थानिक लोक प्रतिनिधींच्या सहकार्याने राबविण्यात येईल.

**माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहीम राबविण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.**

### अ) मोहिमेचे उद्दिष्ट

- राज्यामध्ये गृहभेटीद्वारे संशयीत कोवीड तपासणी व उपचार.
- अति जोखमीचे (Co-morbid) व्यक्ती ओळखून त्यांना उपचार व कोवीड-१९ प्रतिबंधासाठी आरोग्य शिक्षण.
- SARI/ILI रुग्णांचे गृहभेटीद्वारे सर्वेक्षण, कोवीड-१९ तपासणी आणि उपचार.
- गृहभेटीद्वारे प्रत्येक नागरीकांचे कोवीड-१९ बाबत आरोग्य शिक्षण.

### आ) मोहीम कालावधी :-

- माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहीम दि.१५/०९/२०२० ते दि.२५/१०/२०२०या कालावधीत घेण्यात येईल. मोहीमेची सांगता दि. २५/१०/२०२० रोजी होईल.
- मोहीमेची पहिली फेरी दि.१५/०९/२०२० ते दि.१०/१०/२०२० या कालावधीमध्ये होईल आणि दुसरी फेरी दि.१४/१०/२०२० ते दि. २४/१०/२०२० या कालावधीमध्ये होईल. पहिला फेरीचा कालावधी १५ दिवसांचा असेल तर दुसऱ्या फेरीचा कालावधी १० दिवसांचा असेल. (दुसऱ्या फेरीमध्ये कुटुंबाची नावे लिहिण्याची आवश्यकता नसल्यामुळे कालावधी कमी केला आहे.)

### इ) मोहिमेची व्याप्ती :-

माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहीम राज्यातील सर्व महानगरपालिका,नगरपालिका, नगरपंचायत, ग्रामपंचायत, कटक मंडळे इ. ठिकाणी राबविली जाईल. मोहिमेअंतर्गत



Scanned by CamScanner

राज्यातील शहरे, गावे, वाडी,तांडे, पाडे इ. मध्ये राहणाऱ्या प्रत्येक नागरीकाची तपासणी केली जाईल.

**ई) माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहीम अंमलबजावणी :-**

**१) मोहिम नियोजन**

- बृहमुंबई वगळता जिल्हयातील मोहीमेच्या नियोजनाची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील जिल्हयातील महानगरपालिकांसाठी आयुक्त आणि उर्वरीत भागासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. जिल्हाधिकारी यांना सहाय्य करतील. मुंबईमध्ये ही जबाबदारी आयुक्त बृहमुंबई महानगरपालिका यांची राहील.
- नियोजनासाठी महानगरपालिका / नगरपालिकांमध्ये / नगरपंचायत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण भागामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र केंद्रस्थानी धरुन मोहीमेचे नियोजन करावे. महानगरपालिका क्षेत्रामध्ये वॉर्डनुसार नियोजन करावे.
- प्राथमिक आरोग्य केंद्र /वॉर्ड निश्चित झाल्यानंतर त्यातील एकुण घरांची संख्या निश्चित करावी. घरांचे संख्या माहीत नसल्यास सन २०२० च्या अनुमानातील लोकसंख्येच्या २०% संख्या ही एकूण घरे म्हणून नियोजनासाठी घ्यावी. यासाठीचे नियोजन सोबतच्या तक्त्यामध्ये करावे.
- गृहभेटीसाठी एक आरोग्य कर्मचारी आणि २ स्वयंसेवक (एक पुरुष व एक स्त्री) असे तिघांचे पथक असेल. एक पथक १ दिवसात ५० घरांना भेटी देईल. पहिली फेरी १५ दिवस असे गृहीत धरुन संपूर्ण लोकसंख्येसाठी एकूण पथकांची संख्या निश्चित करावी. उदा. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांची लोकसंख्या ५०,००० असेल तर या प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कार्यकक्षेत १०,००० घरे असतील. एकूण १५ दिवस गृहभेटी दयावयाच्या करावयाचे झाल्यास दररोज सरासरी ६५० घरांना भेटी दयाव्या लागतील. यासाठी १३ टीम आवश्यक आहेत. ग्रामीण भागासाठी ३०००० लोकसंख्येच्या प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये साधरणत: ६००० कुटुंबे असतील एकूण १५ दिवस गृहभेटी दयावयाच्या झाल्यास दररोज सरासरी ४०० घरांना भेटी दयाव्या लागतील. यासाठी ८ पथके स्थापन करावी लागतील.
- एकूण पथकांची संख्या आणि स्वयंसेवक ठरल्यानंतर ग्रामीण भागामध्ये प्रत्येक पथकास लोकसंख्येनुसार गाव निश्चित करावे व त्यानुसार दिलेल्या तक्त्यामध्ये नियोजन करावे. शहरी भागामध्ये पथकाचे दैनंदीन सर्वेक्षणसाठीचा भाग निश्चित करताना गल्ली , रस्ता, घर नंबर इत्यादी द्वारे निश्चित करावा.

**२) पथकाचे स्वरुप :-**

पथकामध्ये एक आरोग्य कर्मचारी किंवा आशा आणि २ स्थानीक स्वयंसेवक (१ पुरुष व १स्त्री) असतील हे स्वयंसेवक स्थानीक सरपंच, नगरसेवक यांनी निश्चित करावयाचे आहेत. पथकातील सदस्यांना कोरोना दूत असे संबोधण्यात यावे. मा. सरपंच/नगरसेवक यांचेकडून स्वयंसेवक प्राप्त न झाल्यास त्या ऐवजी १ आरोग्य कर्मचारी/आशा देण्यात यावी. अशा वेळी पथकात २ आरोग्य कर्मचारी/ आशा असतील.

महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायत / ग्रामीण भाग यामध्ये खालील पैकी आरोग्य कर्मचारी सर्वेक्षणासाठी घेण्यात यावेत.

- बहुविध आरोग्य सेविका (स्त्री) (ए.एन.एम.)
- बहुविध आरोग्य सेवक (पुरुष) (आरोग्य सेवक)



Scanned by CamScanner

- आशा कार्यकर्ती
- अंगणवाडी कार्यकर्ती (आवश्यकतेनुसार महिला व बाल कल्याण विभागांची परवानगी घेऊन)
- किमान १०वी पास कोविड दुत (स्वयंसेवक) - प्रत्येक पथकात १ पुरुष व १ स्त्री
- इतर कर्मचारी (उपरोक्त मधून पुरेसे कर्मचारी उपलब्ध झाले नाही तर)
- प्रत्येक ५ ते १० पथकामागे १ डॉक्टर ( वैदयकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र , प्राथमिक आरोग्य पथक किंवा समुदाय आरोग्य अधिकारी.

**३) पथकातील सदस्यांना खालीलप्रमाणे साहित्य सर्वेक्षणाचे वेळी पुरवावे.**

- इन्फ्रारेड थर्मामिटर
- पल्स ऑक्सीमीटर
- स्टिकर
- मार्कर पेन
- टी-शर्ट/कॅप/बॅड/बॅच (उपलब्धतेनुसार )
- नोंदणीसाठी app download
- Blank Forms-
- Triple layer mask
- Sanitizer

**४) मोहीम काळात पथकाने घ्यावयाची काळजी**

पथक सदस्याला सर्वेक्षण करताना घरच्या व्यक्तींकडून सर्वेक्षण पथक सदस्यांची आणि सदस्यांचे घरातील व्यक्तींना संसर्ग होऊ नये यासाठी खालीलप्रमाणे उपाय योजना कराव्यात.

१) सर्वेक्षण मोहीमे दरम्यान सतत मास्क परिधान करुन रहावे.
२) दोन घरांच्या भेटी दरम्यान हात साबणाने धुवावेत किंवा Sanitizer ने निर्जतुक करावेत.
३) शक्यतो मोकळया हवेशीर जागेमध्ये माहीती भरावी.

**५) मोहिमेसाठी लागणारे साहित्य ते कोठून उपलब्ध करुन घ्यावे याची माहीती.**

मोहिमेसाठी लागणारे साहित्य आणि प्रत्येक पथकास दयावयाची संख्या पुढील तक्त्यामध्ये दिली आहे.

| .क्र | तपशीत | संख्या | कोणाकडून प्राप्त होईल |
|---|---|---|---|
| | दारावर लावण्यासाठी Sticker | घरांच्या संख्येनुसार | राज्य स्तरावरुन वितरीत केले जातील |
| | परमनेंट इंक पेन | २ | राज्य स्तरावरुन वितरीत केले जातील |
| | तक्ते | १५ | जेथे App चालणार नाही किंवा आरोग्य कर्मचारी/आशा/स्वयंसेवक वापरु शकत नाहीत अशा ठिकाणी कामापुरते जिल्हा स्तरावर छापून दयावे. |
| | संदर्भ सेवा स्लीप पुस्तीका | १५ | जिल्हास्तरावर घ्यावेत. |
| | कॅप/बॅड/बॅच | ३ | जिल्हा स्तरावर घ्यावेत |
| | टी-शर्ट | ३ | जिल्हास्तरावर घ्यावेत. याचे Specifications, design इ. राज्य स्तरावरुन |



Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | | दिले जाईल. |
| | Pulse Oxymeter | १ | सध्या उपलब्ध असलेले उपकरण वापरावे. उपकरणाचे सेल संपले असल्यास तसेच पल्स ऑक्सीमीटर नादुरुस्त झालेले असल्यास VHNSC/SC/PHC च्या Untied fund मधून सेल किंवा उपकरण खरेदी करावे. |
| | Infrared Thermometer | १ | सध्या उपलब्ध असलेले उपकरण वापरावे. उपकरणाचे सेल संपले असल्यास तसेच पल्स ऑक्सीमीटर नादुरुस्त झालेले असल्यास VHNSC/SC/PHC च्या Untied fund मधून सेल किंवा उपकरण खरेदी करावे. |
| | Triple layer mask | | जिल्हास्तरावरुन पुरवावे. उपलब्ध नसल्यास VHNSC/SC/PHC च्या Untied fund मधून स्थानिक स्तरावर खरेदी करावी. |
| ० | Sanitizer | | जिल्हास्तरावरुन पुरवावे. उपलब्ध नसल्यास VHNSC/SC/PHC च्या Untied fund मधून स्थानिक स्तरावर खरेदी करावी. |

## ६) गृहभेटी - पहिली फेरी

- प्रत्येक घरात शिरण्यापूर्वी दाराबाहेर सोयीच्या ठिकाणी Sticker लावण्यात यावेत.
- घरामध्ये गेल्यानंतर प्रत्येक सदस्याची ॲपमध्ये नोंद करण्यात यावी. आणि त्यानंतर
- Infrared Thermometer ने तापमान Pulse Oxymeter ने SpO२ मोजण्यात यावेत व ते नोंदविण्यात यावे.
- ताप असलेली व्यक्ती आढळल्यास (तापमान ९८.६ °F) अशा व्यक्तीस खोकला, घशात दुखणे, थकवा इ. लक्षणे आहेत का याची माहिती घ्यावी.
- घरातील प्रत्येकास मधुमेह, हृदयरोग, कर्करोग, किडनी आजार, अवयव प्रत्यारोपण, दमा इ. आजार आहेत का याबाबत विचारणा करावी आणि दिलेल्या उत्तरानुसार ॲपमध्ये माहीती भरणे.

उपरोक्त माहीती भरल्यानंतर खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

- उपरोक्त माहीती ताप १००.४ अंश फॅरनहाईट (३८°C) इतका किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास किंवा SpO२ ९५% पेक्षा कमी असल्यास रुग्णांस जवळच्या Fever Clinic मध्ये संदर्भीत करावे.
- रुग्णांस SARI / ILIलक्षणे असल्यास Fever Clinic मध्ये संदर्भीत करावे.
- संदर्भीत करताना रुग्णास संदर्भ चिठ्ठी देण्यात यावी तसेच कोवीड-१९ प्रतिबंधाचे सर्व संदेश रुग्ण व घरातील सर्व नातेवाईकांना द्यावेत.
- घरातील कोणत्याही व्यक्तीस मधुमेह, उच्चरक्तदाब, किडनी आजार, Organ transplant, लठ्ठपणा,दमा किंवा इतर मोठे आजार असल्यास त्यांची SpO२ तपासणी पुन्हा करुन खात्री करावी. अशा रुग्णांचे तापमान ९८.७ °F (३७°C) पेक्षा जास्त असेल



Scanned by CamScanner

आणि १००.४°F पेक्षा कमी असेल तरीसुध्दा त्यांना Fever treatment Centerयेथे संदर्भीत करावे.

- ताप, SpO२ ९५ पेक्षा कमी, Co-morbid Condition या तीन पैकी कोणतेही २ लक्षणे आढळलयास अशा व्यक्तीस High risk संबोधून त्वरीत रुग्णवाहिका बोलावून जवळच्या Fever Treatment Center / Covid Care Center ला संदर्भीत करावे.
- घरातील सर्व व्यक्तींची तपासणी पूर्ण झाल्यावर दारावर असलेल्या Sticker वर घराचा App वर generate झालेल्या क्र.गृह भेटीची तारीख/वेळ , सर्वे करणाऱ्या पथकाचा क्रमांक पथकातील सदस्यांची अध्याक्षरे आणि Co- Morbid व्यक्ती असल्यास तशी नोंद करावी व त्यानंतर पुढील घरास भेट द्यावी.

**७) गृहभेटी - दुसरी फेरी**

- कुटुंबातील सदस्यांची माहीती पहिल्या फेरीत घेतलेली असल्यामुळे दुसऱ्या फेरीमध्ये दररोज ७५-१०० घरे करावीत.
- दुसऱ्या फेरीमध्ये सर्वांचे तापमान व SpO२ मोजावे. दरम्यानच्या काळात घरातील कोणाला मोठा आजार होऊन गेल्या का याची खात्री करावी.
- पुन्हा एकवेळा आरोग्य संदेश द्यावेत.
- ताप १००.४ फॅरनहरिट( (३८°C) पेक्षा किंवा त्यापेक्षा जास्त असलयास आणि हे SpO२ ९४% पेक्षा कमी असल्यास रुग्णास संदर्भीत करावे.
- पहील्या फेरीच्या वेळी गैरहजर असणाऱ्या घरातील व्यक्तींची Co-morbid Condition साठी चौकशी करावी.

**उ) प्रशिक्षण**

मोहीमेमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व आरोग्य कर्मचा-यांचे, स्वयंसेवकांचे १ दिवस प्रशिक्षण प्राथमिक आरोग्य केंद्र/वॉर्ड स्तरावर घेण्यात यावे.

प्रशिक्षणासाठी पुस्तिका तयार करण्यात आली आहे. त्यानुसार ॲपचा उपयोग गृहभेटी, गृहभेटीची नोंद, कुटुंबाची माहिती इ. अहवाल सादरीकरण सर्व बाबींचे प्रशिक्षण देण्यात यावे.

**वार्ताहर परिषद**

- सर्व ठिकाणी साहित्य वाटप व प्रशिक्षण झाल्यानंतर वार्ताहर परिषदेचे नियोजन करावे. मोहीम सुरु करणाच्या १-२ दिवस अगोदर राज्य स्तरावर जिल्हा स्तरावर आणि तालुका मा. आमदार यांचे मतदारसंघ स्तरावर वार्ताहर परिषदेचे नियोजन करावे.
    - वार्ताहर परिषदेसाठी त्या भागातील लोक प्रतिनिधी, सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, धर्मगुरु, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, CSR-अंतर्गत मदत करणाऱ्या संस्था या सर्वांना निमंत्रित करावे. वार्ताहर परिषद मध्ये कार्यक्रमाची पूर्ण माहीती द्यावी व मोहीमेची जास्तीजास्त प्रसिध्द करावी.

**ऊ) मोहीमेदरम्यान दयावयाचे संदेश**

अनलॉक कालावधीमध्ये जनतेमध्ये जागरुकता यावी आणि कोवीड-१९ आजाराचा प्रसार होऊ नये यासाठी शास्त्रशुध्द माहीती व योग्य वेळी निर्णय घेण्याची क्षमता वाढविणे आवश्यक आहे. त्यामुळे गृहभेटीदरम्यान खालील प्रमाणे संदेश द्यावेत.



Scanned by CamScanner

१) सामान्य व्यक्ती (कोवीड-पूर्व व्यक्ती) सामान्य व्यक्तींनी कोवीडचा संसर्ग होण्यापासून स्वत:ला वाचविणे आवश्यक आहे. यासाठी खालीलप्रमाणे संदेश द्यावेत.

- सतत मास्क घालून रहावे. मास्क शिवाय घराबाहेर पडू नये.
- दर २-३ तासांनी साबणाने स्वच्छ हात धुवावेत. हात धुण्याची सोय नसलेल्या ठिकाणी (उदा.प्रवासात) सॅनिटायझरचा वापर करावा.
- नाक, तोंड, डोळे यांना हात लाऊ नये.
- ताप आल्यास तसेच सर्दी/खोकला/घसा दुखणे, धाप लागणे, खूप थकवा येणे अशी लक्षणे दिसल्यास त्वरीत जवळच्या Fever Clinic मध्ये जाऊन तपासणी करुन घ्यावी.
- मधुमेह, हृदयविकार, किडनी आजार, लठ्ठपणा इ. असल्यास दररोज तापमान मोजावे व तापमान ९८.७°F (३७° c) पेक्षा जास्त आढळल्यास Fever Clinic मध्ये तपासणी करावी,सध्या सुरु असलेले आजारामधील उपचार सुरु ठेवावेत त्यात खंड पडू देऊ नये,डॉक्टरांकडून नियमित तपासणी करुन घ्यावी.
- कोवीडमुळे होणारी गुंतागुंत व मृत्यू टाळण्यासाठी ताप, खोकला, दम लागणे इ. लक्षणे आढल्यास त्वरीत Fever Clinic किंवा कोवीड चाचणी केंद्रात जाऊन कोवीड-१९ चाचणी करुन घ्यावी व डॉक्टरांच्या सल्ल्याने पुढील उपचार करावेत घरच्या घरी उपचार घेऊ नयेत.

२) कोवीड -Positive व्यक्ती Home Isolation अंतर्गत घरी राहणाऱ्या किंवा रुग्णालयातून १० दिवसानंतर ७ दिवसाचे होम आयसोलेशन मध्ये घरी असलेल्या व्यक्तींसाठी खालील संदेश द्यावेत.

- सतत मास्क लावावा.
- खोलीच्या / घराबाहेर पडू नये.
- दर २ तासांनी स्वच्छ हात धुवावेत.
- स्वत्रंत टॉयलेट / बाथरुम जेवणांची भांडी वापरावीत.
- कपडे स्वतंत्रपणे धुवावेत.
- ताप आल्यास / थकवा जाणवू लागल्यास त्वरीत रुग्णालयात जावे.

३) कोवीड होवून गेलेले व्यक्ती ( रुग्णालयातुन येवुन ७ दिवस घरी आयसोलेशन पुर्ण झालेलया व्यक्ती कोवीड आजार होवून गेला तरीही स्वत:ची काळजी घेणे आवश्यक आहे अशा व्यक्तींना खालील संदेश द्यावेत.

- फुफुसाचे फायब्रोसीस, किडनी , लिव्हर इ. मुळे कोवीड-१९ आजारानंतर शारीरीक क्षमता कमी होते असे निदर्शनास आले आहे. त्यानुसार कोवीड-१९ आजारातुन बरे झालेला व्यक्तींना ते पुर्वीप्रमाणेच काम करु शकतात का याची चौकशी करावी. थकवा येत असलयास तसेच दम लागत असल्यास अशा व्यक्तीस विशेषतज्ञाकडे संदर्भीत करावे.
- कोवीड-१९ आजार होवुन गेला म्हणुन वैयक्तीक प्रतिबंधाच्या बाबीमध्ये दुर्लक्ष करु नये
- मधुमेह, उच्चरक्तदाब , हृदयविकार किडनी आजार इ. आजार असल्यास आजारावर वैयक्तीक सलयानुसार औषधोपचार सुरु आहे याची खात्री करावी.



Scanned by CamScanner

- कोवीड-१९ मधुन बरे झालेलया व्यक्तीस प्लाझमा दान करावयाचा असलयास SBTC Website ची माहीती द्यावी आणि त्यासाठी संदर्भीत करावे.

**ए) माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहिमेसाठी जनतेचा सहभाग**

- माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहमेसाठी जनतेचा सहभाग घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.
- मोहीमेसाठी लोकप्रतिनधी, सर्व राजकीय पक्ष, स्वयंसेवी संस्था इ. चा सहभाग असावा.
- महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्रातील मा.नगरसेवक यांच्या सल्ल्याने त्यांचे कार्यक्षेत्रातील मोहीमेचे नियोजन व उद्धाटन करावे.
- ग्रामीण भागामध्ये सरपंच/ग्रामपंचायत सदस्य यांच्या सल्ल्याने त्यांचे कार्यक्षेत्रातील मोहीमेचे नियोजन व उद्धाटन करावे.
- प्रत्येक पथकामध्ये कोवीडदुत स्वयंसेवक सरपंच / नगरसेवक यांनी द्यावेत. यासाठी त्यांना एकूण आवश्यक संख्या ग्रामीण भागात आणि शहरी भागात महानगरपालिकांचे आरोग्य अधिकारी वैदयकीय अधिकारी यांनी कळवावी.
- CSR निधी मधून कुटुंबीयांना विशेषता Co-morbid व्यक्ती असणाऱ्यासाठी मोफत मास्क व साबण उपलब्ध झाल्यास त्यांचे वाटप मा.नगरसेवक/सरपंच मा. आमदार यांचे हस्ते करावे.
- कार्यक्षेत्रातील स्वयंसेवी लोकांना त्यांचे कार्यक्षेत्रातील भाग दयावा. या संस्था सर्वेक्षण, आरोग्य विषयी माहीती इ.बाबत जी मदत करण्याची इच्छा व्यक्त करतील त्यानुसार त्यांना जबाबदारी द्यावी.
- शहरातील / गावातील सर्व धर्माच्या धर्मगुरुंची एक बैठक घ्यावी व त्यांना या सर्वेक्षणात सहभागी होण्याची विनंती करावी.
- Fever Treatment Center मध्ये सरपंच / नगरसेवक मा. आमदार यांना उपस्थित राहण्याची विनंती करावी. त्यांचे देखरेखी अंतर्गत सवेक्षण कार्यवाही करावी.

**ऐ) मोहिमेचे नियोजन व सनियंत्रण जबाबदारी**

मोहीमेच्या नियोजन अंमलबजावणी व संनियंत्रणाची जबाबदारी खालीलप्रमाणे असेल.

| क्र. | स्तर | अधिकारी / कर्मचारी | जबाबदारी |
|---|---|---|---|
| १ | राज्य | संचालक आरोग्य सेवा, पुणे<br>अति. अभियान संचालक मुंबई.<br>सहसंचालक (खरेदी) मुंबई | राज्य स्तरावरून सर्वेक्षणासाठी लागणारे साहित्य प्राप्त करुन घेणे व वितरीत करणे .<br>सर्वेक्षणाचे नियोजन व अंमलबजावणी<br>निधी प्राप्त करुन घेणे व वितरीत करणे |
| २ | विभाग | विभागीय आयुक्त | विभागीय स्तरावर मोहिमेचे संनियंत्रण<br>जिल्हास्तरावर आंतरविभागीय समन्वय<br>जिल्हयांमधील मोहिम अंमलबजावणीचा नियमित आढावा घेणे |



Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | | प्राचार्य आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र | प्रशिक्षण साहित्य तयार करणे<br>प्रशिक्षण कार्यक्रम तयार करणे<br>प्रशिक्षणकार्यक्रम संनियंत्रण |
| ४ | जिल्हा | जिल्हाधिकारी | जिल्हयाचे नियोजन ( नगरपरिषद, नगरपंचायत व कटक मंडळासह )<br>विभागांमध्ये समन्वय<br>वेळेमध्ये मोहीम पुर्ण होण्यामध्ये दक्षता घेणे<br>इतर विभागांचा सहभाग |
| ५ | महानगरपालीका | आयुक्त महानगरपालीका | महानगरपालीका नियोजन<br>महानगरपालीकेच्या सर्व स्त्रोतांमध्ये समन्वय वेळेमध्ये मोहीम पुर्ण होण्यामध्ये दक्षता घेणे |
| ६ | जिल्हा (ग्रामीण) | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परीषद | ग्रामीण भागामध्ये नियोजन<br>सर्व विभागांमध्ये समन्वय<br>वेळेमध्ये मोहीम पुर्ण करण्याची दक्षता घेणे |
| ७ | महानगरपालिका<br><br>जिल्हा | वैदयकिय आरोग्य अधिकारी (आरोग्य प्रमूख) महानगरपालिका<br>जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक | मोहिमेचे नियोजन<br>साहित्य प्राप्त करुन वाटप करणे<br>निधी प्राप्त करुन वाटप करणे<br>संदर्भ सेवा प्लॅन तयार करुन सर्व संबंधीतांना कळविणे.<br>संदर्भसेवा रुग्णालय / प्राथमिक आरोग्य केंद्रे तयार ठेवणे, याठिकाणी औषधे, तपासणी साहित्य उपलब्ध करुन देणे. |
| ८ | तालुका | तालुका आरोग्य अधिकारी / वैदयकिय अधिकारी<br>तहसीलदार/गटविकास अधिकारी | कार्यक्षेत्रातील नियोजन साहित्य व निधी वाटप, कर्मचा-यांचे प्रशिक्षण, Reporting, संदर्भीत रुग्णांना सेवा |
| ९ | गाव | बहुविध आरोग्य सेवक (स्त्री / पु.)<br>आशा, आरोग्य सहायक | गृहभेटी<br>तपासणी<br>संदर्भ सेवा |

**यासाठी प्रशासकीय विभाग व त्यांची जबाबदारी खालील तक्त्यात नमूद केलेली आहे.**

| अ.क्र. | विभाग | बाबींवर करावयाचा खर्च |
|---|---|---|
| १ | सार्वजनिक आरोग्य विभाग | मोहिमेचे नियोजन, अंमलबजावणी, कर्मचारी प्रशिक्षण<br>प्रशिक्षण साहित्य प्राप्त करून वाटप करणे,<br>दैनंदिन अहवाल/अंतिम अहवाल मुल्यमापन |
| २ | नगर विकास विभाग | महानगरपालिका, नगरपालिका नगर पंचायत कटक मंडळ इ क्षेत्रातील मोहीम अंमलबजावणी व कर्मचारी संनियंत्रण, महापौर, |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | नगराध्यक्ष, नगरसेवक यांचेकडून स्वयंसेवकांचे नामनिर्देशन |
| ३ | ग्राम विकास विभाग | ग्रामीण भागातील मोहिमेची अंमलबजावणी व संनियंत्रण, जिल्हा परिषद, अध्यक्ष/सदस्य, पंचायत समिती, सभापती/सदस्य, सरपंच यांचेकडून स्वयंसेवकांचे नामनिर्देशन |
| ४ | महिला व बाल कल्याण विभाग | अंगणवाडी कार्यकर्त्या उपलब्ध करुन देणे |
| ५ | महसूल विभाग | विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारीस्तरावरील अंमलबजावणी व समन्वय |

**ओ) मोहिमेची अहवाल सादरीकरण**

मोहिमेसाठी आशा / ए.एन.एम. त्यांना दिलेल्या TAB च्या मदतीने व इतर कर्मचारी स्वत:च्या Android Mobile वरुन दररोज मोहीमेचा अहवाल दयावे. यासाठी एक Software तयार करण्यात येईल व एक Dashboard तयार केले जाईल. याबाबत स्वतंत्रपणे मार्गदर्शक सुचना देण्यात येतील.

**औ) माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहीम बक्षिस योजना**

सदरील बक्षिस योजना व्यक्ती आणि संस्थांसाठी असतील. व्यक्तींसाठीच्या योजनांमध्ये निबंध स्पर्धा, पोष्टर स्पर्धा,आरोग्य शिक्षण मेसेजेसच्या स्पर्धा इ. घेण्यात येतील तर संस्थांसाठी वेगवेगळया संस्थांच्या कामकाजानुसार बक्षिस योजना देण्यात येईल.

बक्षिस योजनेची प्रसिध्दी राज्यस्तरावरुन सर्व वृत्तपत्रामध्ये देण्यात येईल. त्यामध्ये वैयक्तिक बक्षिसासाठीचे साहित्य जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करण्याबाबत कळविण्यात येईल. यासाठी जिल्हाधिकारी यांनी एक अधिकारी निश्चित करावा.

आलेले साहित्य तपासून त्यांना गुणानुक्रमांक देण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी स्थानिक स्तरावर एक समिती नेमावी व त्या समितीच्या प्रमुखाने गुणानुक्रमांक निश्चित करावेत.

**१) व्यक्तींसाठीच्या बक्षिस योजना**

विदयार्थी, पालक, सामान्य व्यक्ती यांचेसाठी या योजना लागु असतील. राज्यस्तर वृत्तपत्रांमध्ये आणि दुरचित्रवाणीवरुन जनतेला सहभागासाठी आवाहन करण्यात येईल.

प्राप्त झालेले निबंध, पोष्टर्स , मेसेजेस, शॉर्ट फील्म या अनुभवी परिक्षकांकडुन तपासले जातील. बक्षिस मिळालेला निबंध, पोष्टर्स, फील्मस इ. ना राज्य शासनातर्फे प्रसिध्दी देण्यात येईल. सर्वांना ढाल आणि क्रमांकास खालीलप्रमाणे बक्षिस देण्यात येईल.

| अ.क्र. | बक्षिस | राज्यस्तर | जिल्हास्तर | महानगरपालिका स्तर | मा.आमदार मतदार संघ स्तर |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ ले बक्षिस | १०००० | ५००० | ५००० | ३००० |
| २ | २ रे बक्षिस | ५००० | ३००० | ३००० | २००० |
| ३ | ३ रे बक्षिस | ३००० | २००० | २००० | १००० |

**२) संस्थांसाठीच्या बक्षिस योजना**



Scanned by CamScanner

जिल्हास्तरावर नागरी आणि ग्रामीण असे २ विभाग असतील प्रत्येक विभागात प्रथम ३ संस्था निवडण्यात येतील व त्यांना बक्षिस दिले जाईल.

संस्थेचा गुणानुक्रम काढण्यासाठी खालील प्रमाणे निकष असतील

- मोहीम पहिल्या फेरीमधील गृहभेटीचे प्रमाण .(१० गुण)
- प्रति हजार लोकसंख्येमध्ये Covid-१९चाचणी (मोहिम कालावधीमध्ये ) प्रमाण. (३० गुण)
- CSR अंतर्गत किती Mask व हात धुण्यासाठी साबण वाटप केले प्रति हजार लोकसंख्या.(२० गुण)
- किती SARI/ILI रुग्ण प्रती हजार लोकसंख्येत शोधून त्यांची चाचणी केली.(१० गुण)
- कोवीड-१९ मृत्यू प्रमाण (३० गुण )

मिळालेल्या गुणांनुसार ग्रामपंचायत / वार्डातील हिरवे (७५%+) पिवळे (४१-७४%) लाल (४१%पेक्षा कमी ) कार्ड देण्यात येईल.

हिरवे कार्ड दिलेल्या संस्थांना ढाल आणि खालील प्रमाणे बक्षिसे देण्यात येतील.

| अ.क्र. | बक्षिस | राज्यस्तर | जिल्हास्तर | महानगरपालिका स्तर | मा.आमदार मतदार संघ स्तर |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ ले बक्षिस | १ लाख | ५० हजार | ५० हजार | १० हजार |
| २ | २ रे बक्षिस | ५० हजार | ३० हजार | ३० हजार | ५ हजार |
| ३ | ३ रे बक्षिस | ३० हजार | २० हजार | २० हजार | ३ हजार |

बक्षिस मिळालेल्या संस्थांना जिल्हा आणि राज्य स्तरावर समारंभ आयोजीत करुन जिल्हा स्तरावर मा. पालकमंत्री यांचे हस्ते आणि राज्य स्तरावर मा. मुख्यमंत्री यांचे हस्ते बक्षिस वितरण करण्यात येईल.

*******



Scanned by CamScanner

# माझे कुटुंब माझी जबाबदारी

**मोहीम अंमलबजावणी मार्गदर्शक पुस्तीका**



Scanned by CamScanner

## माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहीम

राज्यात सध्या कोविड बाधित रुग्णाच्या निकट संपर्कातील व्यक्तींचा शोध घेण्यासाठी ट्रेस, ट्रैक, ट्रीट या त्रिसुत्रीचा वापर करून कोविड प्रादुर्भाव आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. असे असूनही, महाराष्ट्र राज्यामध्ये कोविड-१९ या आजाराचे रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मुंबई पुणे, ठाणे इ. शहरामधील या आजाराची रुग्णांच्या तुलनेने स्थिर होत असली तरी इतर जिल्हे आणि ग्रामीण भागामध्ये कोविड-१९ रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. राज्याच्या अनलॉक मार्गदर्शक सुचनांनुसार हळूहळू जनजीवन पुर्वपदावर येत असून सामान्य जनतेमध्ये या आजाराची भीती कमी होत आहे. अनलॉक सुरु असताना कोरोना नियंत्रण अधिक प्रभावीपणे करण्यासाठी राज्यातील सर्व लोकसंख्येला २ वेळा भेटी देऊन आरोग्य शिक्षण, महत्त्वाचे आरोग्य संदेश संशयीत कोविड रुग्ण शोधणे तसेच मधुमेह, हृदयविकार, किडनी आजार, लठ्ठपणा यासारख्या महत्त्वाच्या Co-morbid condition असणाऱ्या व्यक्ती शोधून काढणे, अशा activities करण्यात येतील. मोहिम कालावधीमध्ये प्रत्येक व्यक्तीस आरोग्य शिक्षण व कोविड प्रतिबंधाचे संदेश देण्यात येतील, संपूर्ण मोहीम स्थानिक लोक प्रतिनिधींच्या सहकार्याने राबविण्यात येईल.

**माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहीम राबविण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.**

### अ) मोहिमेचे उद्दिष्ट :

- राज्यामध्ये गृहभेटीद्वारे संशयीत कोविड तपासणी व उपचार.
- अति जोखमीचे (Co-morbid) व्यक्ती ओळखून त्यांना उपचार व कोविड-१९ प्रतिबंधासाठी आरोग्य शिक्षण
- SARI / ILI रुग्णांचे गृहभेटीद्वारे सर्वेक्षण, कोविड-१९ तपासणी आणि उपचार.
- गृहभेटीद्वारे प्रत्येक नागरिकाचे कोविड-१९ बाबत आरोग्य शिक्षण.

### आ) मोहीम कालावधी :

- माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहीम दि. १५/०९/२०२० ते दि.२५/१०/२०२० या कालावधीत घेण्यात येईल. मोहीमेची सांगता दि.२५/१०/२०२० रोजी होईल.
- मोहीमेची पहिली फेरी दि. १५/०९/२०२० ते दि. १०/१०/२०२० या कालावधीमध्ये होईल आणि दुसरी फेरी दि.१४/१०/२०२० ते दि. २४/१०/२०२० या कालावधीमध्ये होईल. पहिला फेरीचा कालावधी १५ दिवसांचा असेल तर दुसऱ्या फेरीचा कालावधी १० दिवसांचा असेल. (दुसऱ्या फेरीमध्ये कुटुंबाची नावे लिहिण्याची आवश्यकता नसल्यामुळे कालवधी कमी केला आहे.)

Scanned by CamScanner

### इ) मोहिमेची व्याप्ती :

माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहीम राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, ग्रामपंचायत, कटक मंडळे इ. ठिकाणी राबविली जाईल. मोहिमेअंतर्गत राज्यातील शहरे, गावे, वाडी, तांडे, पाडे इ. मध्ये राहणाऱ्या प्रत्येक नागरीकाची तपासणी केली जाईल.

### ई) माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहीम अंमलबजावणी :

#### १) मोहिम नियोजन :

- बृहन्मुंबई वगळता जिल्ह्यातील मोहीमेच्या नियोजनाची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील जिल्ह्यातील महानगरपालिकांसाठी आयुक्त आणि उर्वरित भागासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी यांना सहाय्य करतील. मुंबईमध्ये ही जबाबदारी आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांची राहील.
- नियोजनासाठी महानगरपालिका / नगरपालिकांमध्ये / नगरपंचायत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण भागामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र केंद्रस्थानी धरुन मोहीमेचे नियोजन करावे. महानगरपालिका क्षेत्रामध्ये वॉर्डनुसार नियोजन करावे.
- प्राथमिक आरोग्य केंद्र /वॉर्ड निश्चित झाल्यानंतर त्यातील एकूण घरांची संख्या निश्चित करावी, घरांची संख्या माहीत नसल्यास सन २०२० च्या अनुमानातील लोकसंख्येच्या २०% संख्या ही एकूण घरे म्हणून नियोजनासाठी घ्यावी. यासाठीचे नियोजन सोबतच्या तक्त्यामध्ये करावे.
- गृहभेटीसाठी एक आरोग्य कर्मचारी आणि २ स्वयंसेवक (एक पुरुष व एक स्त्री) असे तिघांचे पथक असेल. एक पथक १ दिवसात ५० घरांना भेटी देईल, पहिली फेरी १५ दिवस असे गृहीत धरुन संपूर्ण लोकसंख्येसाठी एकूण पथकाची संख्या निश्चित करावी. उदा. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राची लोकसंख्या ५०,००० असेल तर या प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कार्यकक्षेत १०,००० घरे असतील. एकूण १५ दिवस गृहभेटी द्यावयाच्या झाल्यास दररोज सरासरी ६५० घरांना भेटी द्याव्या लागतील. यासाठी १३ टीम आवश्यक आहेत. ग्रामीण भागासाठी ३०,००० लोकसंख्येच्या प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये साधारणत: ६००० कुटुंबे असतील एकूण १५ दिवस गृहभेटी द्यावयाच्या झाल्यास दररोज सरासरी ४०० घरांना भेटी द्याव्या लागतील. यासाठी ८ पथके स्थापन करावी लागतील.

Scanned by CamScanner

- एकूण पथकांची संख्या आणि स्वयंसेवक ठरल्यानंतर ग्रामीण भागामध्ये प्रत्येक पथकास लोकसंख्येनुसार गाव निश्चित करावे व त्यानुसार दिलेल्या तक्त्यामध्ये नियोजन करावे. शहरी भागामध्ये पथकाचे दैनंदीन सर्वेक्षणसाठीचा भाग निश्चित करताना गल्ली, रस्ता, घर नंबर इत्यादीद्वारे निश्चित करावा.

## २) पथकाचे स्वरुप :

पथकामध्ये एक आरोग्य कर्मचारी किंवा आशा आणि २ स्थानिक स्वयंसेवक (१ पुरुष व १ स्त्री) असतील. हे स्वयंसेवक स्थानीक सरपंच, नगरसेवक यांनी निश्चित करावयाचे आहेत. पथकातील सदस्यांना कोरोना दूत असे संबोधण्यात यावे. मा. सरपंच/नगरसेवक यांचेकडून स्वयंसेवक प्राप्त न झाल्यास त्या ऐवजी १ आरोग्य कर्मचारी/आशा देण्यात यावी. अशा वेळी पथकात २ आरोग्य कर्मचारी/आशा असतील.

महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायत ग्रामीण भाग यामध्ये खालील पैकी आरोग्य कर्मचारी सर्वेक्षणासाठी घेण्यात यावेत.

- बहुविध आरोग्य सेविका (स्त्री) (ए.एन.एम.)
- बहुविध आरोग्य सेवक (पुरुष) (आरोग्य सेवक)
- आशा कार्यकर्ती
- अंगणवाडी कार्यकर्ती (आवश्यकतेनुसार महिला व बाल कल्याण विभागांची परवानगी घेऊन.)
- किमान १0 वी पास कोविड दुत (स्वयंसेवक) – प्रत्येक पथकात १ पुरुष व १ स्त्री
- इतर कर्मचारी (उपरोक्त मधुन पुरेसे कर्मचारी उपलब्ध झाले नाही तर)
- प्रत्येक ५ ते १0 पथकामागे १ डॉक्टर (वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक आरोग्य पथक किंवा समुदाय आरोग्य अधिकारी.)

## ३) पथकातील सदस्यांना खालीलप्रमाणे साहित्य सर्वेक्षणाचे वेळी पुरवावे.

- इन्फ्रारेड थर्मामिटर
- पल्स ऑक्सिमिटर
- स्टिकर
- मार्कर पेन
- टी-शर्ट/कॅप/बॅड/बॅच (उपलब्धतेनुसार)
- नोंदणीसाठी app download
- Blank Forms
- Triple layer mask
- Sanitizer

Scanned by CamScanner

## ४) मोहीम काळात पथकाने घ्यावयाची काळजी :

पथक सदस्याला सर्वेक्षण करताना घरच्या व्यक्तीकडून सर्वेक्षण पथक सदस्यांची आणि सदस्यांचे घरातील व्यक्तींना संसर्ग होऊ नये यासाठी खालीलप्रमाणे उपाय योजना कराव्यात.



१) सर्वेक्षण मोहीमे दरम्यान सतत मास्क परिधान करुन रहावे.

२) दोन घरांच्या भेटी दरम्यान हात साबणाने धुवावेत किंवा **Sanitizor** ने निर्जतुक करावेत.



३) शक्यतो मोकळ्या हवेशीर जागेमध्ये माहीती भरावी.

## ५) मोहिमेसाठी लागणारे साहित्य ते कोठून उपलब्ध करुन घ्यावे याची माहीती :

मोहिमेसाठी लागणारे साहित्य आणि प्रत्येक पथकास द्यावयाची संख्या पुढील तक्त्यामध्ये दिली आहे.

| तपशील | संख्या | कोणाकडून प्राप्त होईल |
|---|---|---|
| दारावर लावण्यासाठी **Sticker** | घरांच्या संख्येनुसार | राज्य स्तरावरील वितरित केले जातील |
| परमनेट इंक पेन | २ | राज्य स्तरावरील वितरित केले जातील |
| तक्ते | १५ | जेथे ॲप चालणार नाही किंवा आरोग्य कर्मचारी / आशा / स्वयंसेवक वापरू नाहीत अशा ठिकाणी कामापुरते जिल्हा स्तरावर छापून द्यावे. |
| संदर्भ सेवा स्लीप पुस्तीका | १५ | जिल्हास्तरावर घ्यावेत. |
| कॅप / बॅड / बॅच | ३ | जिल्हास्तरावर घ्यावेत. |
| टी-शर्ट | ३ | जिल्हास्तरावर घ्यावेत. याचे **Specifications, Design** इ. राज्यस्तरावरुन दिले जाईल |

Scanned by CamScanner

| तपशील | संख्या | कोणाकडून प्राप्त होईल |
|---|---|---|
| पल्स ऑक्सिमीटर  | १ | सध्या उपलब्ध असलेले उपकरण वापरावे. उपकरणाचे सेल संपले असल्यास तसेच पल्स ऑक्सिमीटर नादुरुस्त झालेले असल्यास **VHNSC/SC/PHC** च्या **Untied fund** मधुन सेल किंवा उपकरण खरेदी करावे. |
| इन्फ्रारेड थर्मामीटर  | १ | सध्या उपलब्ध असलेले उपकरण वापरावे. उपकरणाचे सेल संपले असल्यास तसेच पल्स ऑक्सिमीटर नादुरुस्त झालेले असल्यास **VHNSC/SC/PHC** च्या **Untied fund** मधुन सेल किंवा उपकरण खरेदी करावे. |
| ट्रिपल लेअर मास्क  | | जिल्हास्तरावरुन पुरवावे. उपलब्ध नसल्यास **VHNSC/SC/PHC** च्या **Untied fund** मधुन स्थानिक स्तरावर खरेदी करावी. |
| सॅनिटायझर  | | जिल्हास्तरावरुन पुरवावे. उपलब्ध नसल्यास **VHNSC/SC/PHC** च्या **Untied fund** मधुन स्थानिक स्तरावर खरेदी करावी. |

## ६) गृहभेटी–पहिली फेरी :

- प्रत्येक घरात शिरण्यापूर्वी दाराबाहेर सोयीच्या ठिकाणी स्टिकर लावण्यात यावेत.
- घरामध्ये गेल्यानंतर प्रत्येक सदस्याची ॲपमध्ये नोंद करण्यात यावी. आणि त्यानंतर
- इन्फ्रारेड थर्मामीटर ने तापमान पल्स ऑक्सिमीटरने **SpO2** मोजण्यात यावेत व ते नोंदविण्यात यावे.
- ताप असलेली व्यक्ती आढळल्यास (तापमान ९८.६$^{0}$F) अशा व्यक्तीस खोकला, घशात दुखणे, थकवा इ. लक्षणे आहेत का याची माहिती घ्यावी.
- घरातील प्रत्येकास मधुमेह, हृदयरोग, कर्करोग, किडनी आजार, अवयव प्रत्यारोपण, दमा इ. आजार आहेत का याबाबत विचारणा करावी आणि दिलेल्या उत्तरानुसार ॲपमध्ये माहिती भरावी.

Scanned by CamScanner

**उपरोक्त माहिती भरल्यानंतर खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.**

- उपरोक्त माहिती ताप १००.४ अंश फॅरेनहाइट (३८$^{0}$C) इतका किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास किंवा **SpO2** ९५% पेक्षा कमी असल्यास रुग्णांस जवळच्या **Fever Clinic** मध्ये संदर्भीत करावे.
- रुग्णांस **SARI/ILI** लक्षणे असल्यास **Fever Clinic** मध्ये संदर्भात करावे.
- संदर्भीत करताना रुग्णास संदर्भ चिठ्ठी देण्यात यावी तसेच कोविड-१९ प्रतिबंधाचे सर्व संदेश रुग्ण व घरातील सर्व नातेवाईकांना द्यावेत.
- घरातील कोणत्याही व्यक्तीस मधुमेह, उच्च रक्तदाब, किडनी आजार, अवयव प्रत्यारोपण, लठ्ठपणा, दमा किंवा इतर मोठे आजार असल्यास त्यांची **SpO2** तपासणी पुन्हा करुन खात्री करावी. अशा रुग्णांचे तापमान ९८.७ अंश फॅरेनहाइट (३७$^{0}$C) पेक्षा जास्त असेल आणि १००.४ अंश फारेनहाइट पेक्षा कमी असेल तरी सुध्दा त्यांना **Fever Treatment Center** येथे संदर्भीत करावे.
- ताप, SpO2 ९५ पेक्षा कमी. Co-morbid Condition या तीन पैकी कोणतेही २ लक्षणे आढळल्यास अशा व्यक्ती हायरिस्क संबोधुन त्वरीत रुग्णवाहिका बोलावून जवळच्या Fever Treatment Center / Covid Care Center ला संदर्भीत करावे.
- घरातील सर्व व्यक्तींची तपासणी पूर्ण झाल्यावर दारावर असलेल्या स्टिकरवर घराचा ॲपवर जनरेट झालेल्या क्रमांक, गृह भेटीची तारीख/वेळ, सर्वे करणाऱ्या पथकाचा क्रमांक पथकातील सदस्यांची अध्याक्षरे आणि Co-morbid व्यक्ती असल्यास तशी नोंद करावी व त्यानंतर पुढील घरास भेट द्यावी.

## ७) गृहभेटी-दुसरी फेरी

- कुटुंबातील सदस्यांची माहीती पहिल्या फेरीत घेतलेली असल्यामुळे दुसऱ्या फेरीमध्ये दररोज ७५-१०० घरे करावीत.
- दुसऱ्या फेरीमध्ये सर्वांचे तापमान व **SpO2** मोजावे. दरम्यानच्या काळात कोणाला मोठा आजार होऊन गेला का याची खात्री करावी.
- पुन्हा एकवेळा आरोग्य संदेश द्यावेत.
- ताप १००.४ अंश फॅरेनहाइट (३८$^{0}$C) पेक्षा किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास आणि हे **SpO2** ९४% पेक्षा कमी असल्यास रुग्णास संदर्भीत करावे.
- पहील्या फेरीच्या वेळी गैरहजर असणाऱ्या घरातील व्यक्तीची **Co-morbid Condition** साठी चौकशी करावी.

Scanned by CamScanner

### उ) प्रशिक्षण

मोहीमेमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांचे, स्वयंसेवकांचे १ दिवस प्रशिक्षण प्राथमिक आरोग्य केंद्र/वॉर्ड स्तरावर घेण्यात यावे. प्रशिक्षणासाठी पुस्तिका तयार करण्यात आली आहे. त्यानुसार ॲपचा उपयोग गृहभेटी, गृहभेटीची नोंद, कुटुंबाची माहिती इ. अहवाल सादरीकरण सर्व बाबींचे प्रशिक्षण देण्यात यावे.

## वार्ताहर परिषद

- सर्व ठिकाणी साहित्य वाटप व प्रशिक्षण झाल्यानंतर वार्ताहर परिषदेचे नियोजन करावे. मोहीम सुरु करण्याच्या १-२ दिवस अगोदर राज्य स्तरावर, जिल्हा स्तरावर आणि तालुका, मा. आमदार यांचे मतदारसंघ स्तरावर वार्ताहर परिषदेचे नियोजन करावे.
- वार्ताहर परिषदेसाठी त्या भागातील लोक प्रतिनिधी, सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, धर्मगुरु, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, सीएसआर अंतर्गत मदत करणाऱ्या संस्था या सर्वांना निमंत्रित करावे. वार्ताहर परिषद मध्ये कार्यक्रमाची पूर्ण माहिती द्यावी व मोहीमेची जास्तीतजास्त प्रसिध्द करावी.

### ऊ) मोहीमेदरम्यान द्यायचे संदेश

अनलॉक कालावधीमध्ये जनतेमध्ये जागरुकता यावी आणि कोविड-१९ आजाराचा प्रसार होऊ नये यासाठी शास्त्रशुध्द माहीती व योग्य वेळी निर्णय घेण्याची क्षमता वाढविणे आवश्यक आहे. त्यामुळे गृहभेटी दरम्यान खालील प्रमाणे संदेश द्यावेत.

१) सामान्य व्यक्ती (कोविड-पूर्व व्यक्ती) सामान्य व्यक्तींनी कोविडचा संसर्ग होण्यापासून स्वत:ला वाचविणे आवश्यक आहे. यासाठी खालीलप्रमाणे संदेश द्यावेत.

- सतत मास्क घालून रहावे, मास्क शिवाय घराबाहेर पडू नये.
- दर २-३ तासांनी साबणाने स्वच्छ हात धुवावेत. हात धुण्याची सोय नसलेल्या ठिकाणी (उदा : प्रवासात) सॅनिटायझरचा वापर करावा
- नाक, तोंड, डोळे यांना हात लाऊ नये.
- ताप आल्यास तसेच सर्दी/खोकला/घसा दुखणे, धाप लागणे, खूप थकवा येणे अशी लक्षणे दिसल्यास त्वरीत जवळच्या **Fever Clinic** मध्ये जाऊन तपासणी करुन घ्यावी.
- मधुमेह, हृदयविकार, किडनी आजार, लठ्ठपणा इ. असल्यास दररोज तापमान मोजावे व तापमान ९८.७ फॅरेनहाईट (३७$^{0}$C) पेक्षा जास्त आढळल्यास **Fever Clinic** मध्ये तपासणी करावी, सध्या सुरु असलेले आजारामधील उपचार सुरु ठेवावेत त्यात खंड पडू देऊ नये, डॉक्टरांकडून नियमित तपासणी करुन घ्यावी.

Scanned by CamScanner

- कोविडमुळे होणारी गुंतागुंत व मृत्यू टाळण्यासाठी ताप, खोकला, दम लागणे इत्यादी लक्षणे आढळ्यास त्वरीत Fever Clinic किंवा कोविड चाचणी केंद्रात जाऊन कोविड-१९ चाचणी करुन घ्यावी व डॉक्टरांच्या सल्ल्याने पुढील उपचार करावेत घरच्या घरी उपचार घेऊ नयेत.

२) कोविड पॉझिटीव्ह व्यक्ती होम आयसोलेशन अंतर्गत घरी राहणाऱ्या किंवा रुग्णालयातून १० दिवसानंतर ७ दिवसाचे होम आयसोलेशन मध्ये घरी असलेल्या व्यक्तीसाठी खालील संदेश द्यावेत.

- सतत मास्क लावावा.
- खोलीच्या/ घराबाहेर पडू नये.
- दर २ तासांनी स्वच्छ हात धुवावेत.
- स्वत्रंत टॉयलेट/बाथरूम, जेवणांची भांडी वापरावीत
- कपडे स्वतंत्रपणे धुवावेत.
- ताप आल्यास / थकवा जाणवू लागल्यास त्वरीत रुग्णालयात जावे.

३) कोविड होवून गेलेले व्यक्ती (रुग्णालयातुन येवुन ७ दिवस घरी आयसोलेशन पूर्ण झालेल्या व्यक्ती) कोविड आजार होवून गेला तरीही स्वत:ची काळजी घेणे आवश्यक आहे अशा व्यक्तींना खालील संदेश द्यावेत.

- फुफुसाचे फायब्रोसीस, किडनी, लिव्हर इ. मुळे कोविड-१९ आजारानंतर शारीरीक क्षमता कमी होते असे निदर्शनास आले आहे. त्यानुसार कोविड-१९ आजारातुन बरे झालेल्या व्यक्तींना ते पुर्वीप्रमाणेच काम करु शकतात का याची चौकशी करावी, थकवा येत असल्यास तसेच दम लागत असल्यास अशा व्यक्तीस विशेषतज्ञाकडे संदर्भीत करावे.
- कोविड-१९ आजार होवुन गेला म्हणुन वैयक्तीक प्रतिबंधाच्या बाबीमध्ये दुर्लक्ष करु नये
- मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, किडनी आजार इ. आजार असल्यास आजारावर वैयक्तीक सल्ल्यानुसार औषधोपचार सुरु आहे याची खात्री करावी.
- कोविड-१९ मधुन बरे झालेल्या व्यक्तीस प्लाझमा दान करावयचा असलयास **SBTC website** ची माहिती द्यावी आणि त्यासाठी संदर्भीत करावे.

Scanned by CamScanner

## ए) माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहिमेसाठी जनतेचा सहभाग

माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहमेसाठी जनतेचा सहभाग घेणे अत्यंत महत्वाचे आहे. यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

- मोहीमेसाठी लोकप्रतिनिधी, सर्व राजकीय पक्ष, स्वयंसेवी संस्था इत्यादींचा सहभाग असावा.
- महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्रातील मा.नगरसेवक यांच्या सल्ल्याने त्यांचे कार्यक्षेत्रातील मोहीमेचे नियोजन व उद्घाटन करावे.
- ग्रामीण भागामध्ये सरपंच/ग्रामपंचायत सदस्य याच्या सल्ल्याने त्याचे कार्यक्षेत्रातील मोहीमेचे नियोजन व उद्घाटन करावे.
- प्रत्येक पथकामध्ये कोविडदुत स्वयंसेवक सरपंच / नगरसेवक यांनी द्यावेत, यासाठी त्यांना एकूण आवश्यक संख्या ग्रामीण भागात आणि शहरी भागात महानगरपालिकांचे आरोग्य अधिकारी वैद्यकीय अधिकारी यांनी कळवावी.
- सीएसआर निधी मधून कुटुंबीयांना विशेषता **Co-monbit** व्यक्ती असणाऱ्यांसाठी मोफत मास्क व साबण उपलब्ध झाल्यास त्यांचे वाटप मा.नगरसेवक/सरपंच मा. आमदार यांचे हस्ते करावे.
- कार्यक्षेत्रातील स्वयंसेवी लोकांना त्यांचे कार्यक्षेत्रातील भाग द्यावा. या संस्था सर्वेक्षण, आरोग्य विषयी माहीती इ. बाबत जी मदत करण्याची इच्छा व्यक्त करतील त्यानुसार त्यांना जबाबदारी द्यावी.
- शहरातील / गावातील सर्व धर्माच्या धर्मगुरुंची एक बैठक घ्यावी व त्यांना या सर्वेक्षणात सहभागी होण्याची विनंती करावी.
- **Fever Treatment Center** मध्ये सरपंच / नगरसेवक, मा. आमदार यांना उपस्थित राहण्याची विनंती करावी. त्यांचे देखरेखी अंतर्गत सर्वेक्षण कार्यवाही करावी.



### ऐ) मोहिमेचे नियोजन व सनियंत्रण जबाबदारी :

मोहीमेच्या नियोजन अंमलबजावणी व संनियंत्रणाची जबाबदारी खालीलप्रमाणे असेल.

| स्तर | अधिकारी/कर्मचारी | जबाबदारी |
|---|---|---|
| राज्य | संचालक आरोग्य सेवा, पुणे<br>अति. अभियान संचालक मुंबई.<br>सहसंचालक (खरेदी) मुंबई | राज्य स्तरावरून सर्वेक्षणासाठी लागणारे साहित्य प्राप्त करुन घेणे व वितरीत करणे.<br>सर्वेक्षणाचे नियोजन व अंमलबजावणी<br>निधी प्राप्त करुन घेणे व वितरीत करणे |
| विभाग | विभागीय आयुक्त | विभागीय स्तरावर मोहिमेचे संनियंत्रण जिल्हास्तरावर आंतरविभागीय समन्वय जिल्ह्यांमधील मोहिम अंमलबजावणीचा नियमित आढावा घेणे |
| | प्राचार्य आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र | प्रशिक्षण साहित्य तयार करणे<br>प्रशिक्षण कार्यक्रम तयार करणे<br>प्रशिक्षण कार्यक्रम सनियंत्रण |
| जिल्हा | जिल्हाधिकारी | जिल्ह्याचे नियोजन (नगर परिषद, नगरपंचायत कटक मंडळासह) विभागांमध्ये समन्वय वेळेमध्ये मोहीम पूर्ण होण्यामध्ये दक्षता घेणे इतर विभागांचा सहभाग. |
| महानगर-पालीका | आयुक्त महानगरपालिका | महानगरपालीका नियोजन महानगर पालिकेच्या सर्व स्त्रोतांमध्ये समन्वय वेळेमध्ये मोहीम पुर्ण होण्यामध्ये दक्षता घेणे |
| जिल्हा (ग्रामीण) | मुख्य कार्यकारी अधिकारी | ग्रामीण भागामध्ये नियोजन सर्व विभागामध्ये समन्वय. वेळेमध्ये मोहीम पुर्ण करण्याची दक्षता घेणे |

Scanned by CamScanner

| स्तर | अधिकारी/कर्मचारी | जबाबदारी |
|---|---|---|
| महानगर–पालिक जिल्हा | वैद्यकीय आरोग्य अधिकारी (आरोग्य प्रमुख) महानगर पालिका जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक | मोहिमेचे नियोजन साहित्य प्राप्त करून वाटप करणे, निधी प्राप्त करुन वाटप करणे, संदर्भ सेवा प्लॅन तयार करुन सर्व सबंधीतांना कळविणे. संदर्भसेवा रुग्णालय / प्राथमिक आरोग्य केंद्रे तयार ठेवणे, याठिकाणी औषधे, तपासणी साहित्य उपलब्ध करुन देणे. |
| तालुका | तालुका आरोग्य अधिकारी /वैद्यकिय अधिकारी तहसीलदार/ गटविकास अधिकारी | कार्यक्षेत्रातील नियोजन साहित्य व निधी वाटप, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण, रिपोर्टींग संदर्भात रुग्णांना सेवा |
| गाव | बहुविध आरोग्य सेवक (स्त्री/पु.) आशा आरोग्य सहायक | गृहभेटी, तपासणी, संदर्भ सेवा |



Scanned by CamScanner

**प्रशासकीय विभाग व त्यांची जबाबदारीखालील तक्त्यात नमद केलेली आहे.**

| विभाग | बाबींवर करावयाचा खर्च |
|---|---|
| सार्वजनिक आरोग्य विभाग | मोहिमेचे नियोजन, अंमलबजावणी, कर्मचारी प्रशिक्षण प्रशिक्षण साहित्य प्राप्त करून वाटप करणे, दैनंदिन अहवाल / अंतिम अहवाल मूल्यमापन |
| नक्षर विकास विभाग | महानगरपालिका, नगरपालिका नगर पंचायत कटक मंडळ इ. क्षेत्रातील मोहीम अंमलबजावणी व कर्मचारी संनियंत्रण, महापौर,नगराध्यक्ष, नगरसेवक यांचेकडून स्वयंसेवकांचे नामनिर्देशन |
| ग्राम विकास विभाग | ग्रामीण भागातील मोहिमेची अंमलबजावणी व संनियंत्रण, जिल्हा परिषद, अध्यक्ष/सदस्य, पंचायत समिती, सभापती/सदस्य, सरपंच यांचेकडून स्वयंसेवकांचे नामनिर्देशन |
| महिला व बाल कल्याण विभाग | अंगणवाडी कार्यकर्त्या उपलब्ध करुन देणे |
| महसूल विभाग | विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी स्तरावर अंमलबजावणी व समन्वय |

## ओ) मोहिमेची अहवाल सादरीकरण

मोहिमेसाठी आशा / ए.एन.एम. त्यांना दिलेल्या टॅबच्या मदतीने व इतर कर्मचारी स्वत:च्या ॲनरॉईड मोबाईलवरुन दररोज मोहीमेचा अहवाल द्यावे. यासाठी एक सॉफ्टवेअर तयार करण्यात येईल व एक डॅशबोर्ड तयार केले जाईल. याबाबत स्वतंत्रपणे मार्गदर्शक सूचना देण्यात येतील.

## औ) माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहीम बक्षिस योजना

सदरील बक्षिस योजना व्यक्ती आणि संस्थांसाठी असतील. व्यक्तींसाठीच्या योजनांमध्ये निबंध स्पर्धा, पोष्टर स्पर्धा, आरोग्य शिक्षण मेसेजेसच्या स्पर्धा इ. घेण्यात येतील तर संस्थासाठी वेगवेगळ्या संस्थांच्या कामकाजानुसार बक्षिस योजना देण्यात येईल.

बक्षिस योजनेची प्रसिध्दी राज्यस्तरावरुन सर्व वृत्तपत्रामध्ये देण्यात येईल. त्यामध्ये वैयक्तिक बक्षिसासाठीचे साहित्य जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करण्याबाबत कळविण्यात येईल. यासाठी जिल्हाधिकारी यांनी एक अधिकारी निश्चित करावा. आलेले साहित्य तपासून त्यांना गुणानुक्रमांक देण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी स्थानिक स्तरावर एक समिती नेमावी व त्या समितीच्या प्रमुखाने गुणानुक्रमांक निश्चित करावेत.

Scanned by CamScanner

## १) व्यक्तींसाठीच्या बक्षिस योजना

विद्यार्थी, पालक, सामान्य व्यक्ती यांचेसाठी या योजना लागू असतील. राज्यस्तर वृत्तपत्रांमध्ये आणि दुरचित्रवाणीवरुन जनतेला सहभागासाठी आवाहन करण्यात येईल.

प्राप्त झालेले निबंध, पोष्टर्स , मेसेजेस, शॉर्ट फिल्म या अनुभवी परिक्षकांकडुन तपासले जातील. बक्षिस मिळालेला निबंध, पोष्टर्स, फिल्म इत्यादींना राज्य शासनातर्फे प्रसिध्दी देण्यात येईल. सर्वांना ढाल आणि क्रमांकास खालीलप्रमाणे बक्षिस देण्यात येईल.

| बक्षिस | राज्यस्तर | जिल्हास्तर | महानगर-पालिका स्तर | मा. आमदार मतदार संघ स्तर |
|---|---|---|---|---|
| १ ले बक्षिस | १0000 | ५000 | ५000 | ३000 |
| २ रे बक्षिस | ५000 | ३000 | ३000 | २000 |
| ३ रे बक्षिस | ३000 | २000 | २000 | १000 |

## २) संस्थांसाठीच्या बक्षिस योजना

जिल्हास्तरावर नागरी आणि ग्रामीण असे २ विभाग असतील प्रत्येक विभागात प्रथम ३ संस्था निवडण्यात येतील व त्यांना बक्षिस दिले जाईल.

**संस्थेचा गुणानुक्रम काढण्यासाठी खालील प्रमाणे निकष असतील**

- मोहीम पहिल्या फेरीमधील गृहभेटीचे प्रमाण (१0 गुण)
- प्रति हजार लोकसंख्येभध्ये कोविड-१९ चाचणी (मोहिम कालावधीमध्ये) प्रमाण (३0 गुण)
- सीएसआर अंतर्गत किती मास्क व हात धुण्यासाठी साबण वाटप केले प्रति हजार लोकसंख्या.(२0 गुण)
- किती SARI/ILI रुग्ण प्रती हजार लोकसंख्येत शोधून त्यांची चाचणी केली.(१0 गुण)
- कोविड-१९ मृत्यू प्रमाण (३0 गुण)

मिळालेल्या गुणांनुसार ग्रामपंचायत / वार्डातील हिरवे (७५%+) पिवळे (४१-७४%) लाल (४१%पेक्षा कमी) कार्ड देण्यात येईल.

हिरवे कार्ड दिलेल्या संस्थांना ढाल आणि खालील प्रमाणे बक्षिसे देण्यात येतील.

Scanned by CamScanner

| बक्षिस | राज्यस्तर | जिल्हास्तर | महानगर-पालिका स्तर | मा. आमदार मतदार संघ स्तर |
|---|---|---|---|---|
| १ ले बक्षिस | १ लाख | ५० हजार | ५० हजार | १० हजार |
| २ रे बक्षिस | ५० हजार | ३० हजार | ३० हजार | ५ हजार |
| ३ रे बक्षिस | ३० हजार | २० हजार | २० हजार | ३ हजार |

बक्षिस मिळालेल्या संस्थांना जिल्हा आणि राज्य स्तरावर समारंभ आयोजीत करुन जिल्हा स्तरावर मा. पालकमंत्री यांचे हस्ते आणि राज्य स्तरावर मा. मुख्यमंत्री यांचे हस्ते बक्षिस वितरण करण्यात येईल.

## + वैद्यकीय मदत कधी घ्यावी? +




24/7 हेल्पलाईन क्रमांक
**1077**

Scanned by CamScanner